**"सप्टेंबर २०१६" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

## (अ) शासन निर्णय / अधिसूचना

- 'पदोन्नती नाकारल्यामुळे उद्भवणारे परिणाम व त्याबाबत अवलंबण्याची कार्यवाही' यासंदर्भात दिनांक १२ सप्टेंबर २०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

- दिनांक १६ सप्टेंबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत मंजूर तरतुदीतून राज्य प्रशिक्षण नियंत्रण व मुल्यमापन यंत्रणा, यशदा, पुणे / ६ विभागीय व ३६ जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांना प्रशासकीय प्रशिक्षणाकरिता प्रशिक्षण शुल्काच्या खर्चापोटी रु.२०.५१ कोटी इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर रकमेच्या मर्यादेत राज्य प्रशिक्षण नियंत्रण व मुल्यमापन यंत्रणा, यशदा, पुणे यांना रु.२.०० कोटी, ६ विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांना रु.४.५० कोटी व ३६ जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांना रु.५.२५ कोटी असे एकूण रु.११.७५ कोटी इतका योजनांतर्गत निधी सहायक अनुदान म्हणून वितरित करण्यात आला आहे.

- मंत्रालयीन विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्या कार्यालयातील लिपिक, लिपिक-टंकलेखक व टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांना सहायक कक्ष अधिकारी पदावर निवडीने नियुक्ती देण्यासाठी दिनांक २७ नोव्हेंबर २०१६ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत ८८ पदांसाठी "सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०१६" घेण्याचे दिनांक २१ सप्टेंबर २०१६ च्या शासन परिपत्रकान्वये घोषित करण्यात आले आहे.

- मंत्रालयीन विभागातील विशेष कार्य अधिकारी या पदावर नियुक्ती देण्यात येऊ नये असे शासन परिपत्रक दिनांक २६ सप्टेंबर २०१६ रोजी निर्गमित करण्यात आले आहे.

- दिनांक २७ सप्टेंबर २०१७ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) व या विभागांतर्गत अन्य पाच कार्यालयांच्या आस्थापनेवरील २१८ अस्थायी पदांना दिनांक २८ फेब्रुवारी २०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे.

- सहायकांच्या कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी व सरळसेवेने नियुक्त झालेल्या कक्ष अधिकाऱ्यांसाठी सन २०१६ च्या विभागीय परीक्षेला पुन्हा (Repeater) बसू इच्छिणाऱ्या उमेदवारांना दिनांक १८ ऑक्टोबर २०१६ पर्यंत अर्ज सादर करण्याच्या सूचना दिनांक २८ सप्टेंबर २०१६ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.

- दिनांक ३० सप्टेंबर २०१६ च्या पत्रान्वये "One week In-Service Training Programme for the year २०१६-१७ for AIS (IAS, IPS & IFoS officers working under the Central Staffing Scheme & Central Secretariat Service (CSS) & Central Secretariat Stenographer Service (CSSS) officers" या विषयाबाबतचे केंद्र शासनाच्या कार्मिक व लोक तक्रार व निवृत्तीवेतन मंत्रालयाचे अर्धशासकीय पत्र महाराष्ट्र संवर्गातील सर्व भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणण्यात आले आहे.

## (ब) पदोन्नती / निवडसूची / ज्येष्ठतासूची

- ९ उपसचिवांना सहसचिव पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. २९ कक्ष अधिकाऱ्यांना अवर सचिव पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.

- मंत्रालय आहार / उपाहारगृहाच्या आस्थापनेवरील गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०१३ ते १ जानेवारी २०१६ रोजीची स्थिती दर्शविणारी तात्पुरती सामाईक ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- मंत्रालय आहार / उपाहारगृहाच्या आस्थापनेवरील व्यवस्थापकीय बाजूच्या गट-ब व गट-क संवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०१३ ते १ जानेवारी २०१६ रोजीची स्थिती दर्शविणारी तात्पुरती सामाईक ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**(क) <u>बदल्या / पदस्थापना</u>**

- "लिपिक-टंकलेखक (मराठी / इंग्रजी) परीक्षा २०१५" मधील शिफारसप्राप्त २८३ उमेदवारांचे मंत्रालयीन प्रशासकीय विभागात दिनांक २८ सप्टेंबर २०१६ च्या ज्ञापनान्वये नियतवाटप करण्यात आले.

- "लिपिक-टंकलेखक (मराठी / इंग्रजी) परीक्षा २०१५" मधील शिफारसप्राप्त ११५२ उमेदवारांचे बृहन्मुंबईतील राज्य शासनाच्या विविध कार्यालयात दिनांक २९ सप्टेंबर २०१६ च्या ज्ञापनान्वये नियतवाटप करण्यात आले.

- सार्वत्रिक बदल्या २०१४, २०१५, २०१६ अंतर्गत अवर सचिव-३, कक्ष अधिकारी-५, सहायक कक्ष अधिकारी-९, लिपिक-टंकलेखक-१० अशा एकूण २७ अधिकारी / कर्मचारी यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. तथापि संबंधित विभागाने संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना बदलीच्या पदावर रुजू होण्यासाठी कार्यमुक्त न केल्याने, आता सामान्य प्रशासन विभागामार्फत संबंधित विभागातून संबंधितांना दिनांक ३० सप्टेंबर २०१६ (म.नं.) पासून कार्यमुक्त करण्यात येत असल्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

- भारतीय प्रशासन सेवेतील ९ अधिकाऱ्यांच्या (४+१+४) दिनांक ७, १९ व २२ सप्टेंबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये बदल्या / पदस्थापना करण्यात आल्या आहेत.

- उपसचिव, अवर सचिव, सहायक कक्ष अधिकारी, लिपिक-टंकलेखक संवर्गातील अनुक्रमे १, ३, १, २ अशा ७ अधिकारी / कर्मचारी यांच्या बदल्या करण्यात आल्या. कक्ष अधिकारी या संवर्गातील २ अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्यात आल्या आहेत.

- उपसचिव संवर्गातील ५ अधिकाऱ्यांना पदोन्नतीचे नियमित दिनांक मंजूर करण्यात आले.

***********